# मुंबई विद्यापीठ

कुलसचिव यांचे
कार्यालय
फोर्ट परिसर, मुंबई
विद्यापीठ,
मुंबई ४०० ०३२

## परिपत्रक

No. REG/ECC/2020-21-UG 1

**विषय** : कोविड – १९ या जागतिक महामारीमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क (Tuition Fees) संदर्भात.

**संदर्भ** : विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्रमांक D.O.No.F.1-1/2020/UGC (TF-COVID-19 /Fee) dated 27th May, 2020

उपरोक्त नमुद विषय तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाचे संदर्भांकित पत्रान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक / विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की कोविड – १९ या जागतिक महामारीमुळे दिनांक २३ मार्च, २०२० पासून केंद्र शासनाने संपर्ण देशात टाळेबंदी जाहीर केलेली आहे. त्यामुळे राज्यातील उद्योगधंदे / व्यवसाय /खाजगी नोकरी इत्यादी क्षेत्रात काम करणा–या नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम झालेला आहे

यास्तव, सदर आर्थिक परिस्थीतीचा विचार करता सर्व सबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०–२०२१ या वर्षाकरीता कोणत्याही शैक्षणिक शुल्कात वाढ करु नये तसेच गरजू विद्यार्थ्यांने विनंती केल्यास त्याच्या आर्थिक परिस्थीतीचा विचार करुन विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क (Tuition Fees) अदा करण्यासाठी हप्त्यांची (Instalments) सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने सुध्दा उपरोक्त संदर्भाकिंत पत्रान्वये विद्यापीठांना व महाविद्यालयांना सुचना दिलेल्या आहेत, याचे काटेकोर पालन करावे

(डॉ. विनोद पाटील)
प्रभारी कुलसचिव

ठिकाण : मुंबई -४०००३२
दिनांक : २१ जून, २०२०

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी –**

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक / विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख.